# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २ नोव्हेंबर २०१५

## प्राचार्य डॉ. अनिल पाटील बीसीयुडी संचालक पदी रुजू

मुंबई – मुंबई विद्यापीठाच्या संचालक, बीसीयुडी ( महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ ) पदावर प्राचार्य डॉ.अनिल पाटील हे आज २ नोव्हेंबर २०१५ रोजी रुजू झाले आहे. शिक्षण क्षेत्रातील ३० वर्षांचा दांडगा अनुभव त्यांना आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध परिषदा, आणि शोध निबंध त्यांनी प्रसिध्द केले आहेत.प्राचार्य डॉ.अनिल पाटील हे अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत होते. आज व्यवस्थापन परिषदेच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यापीठाच्या सलंग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य,अनेक संस्थाचे संचालक यांनी कुलगुरु डॉ.संजय देशमुख आणि कुलसचिव डॉ.एम.ए.खान यांच्या उपस्थित प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांचे अभिनंदन करण्यात आले.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या प्रकल्पाअंतर्गत विद्यापीठ आणि महाविद्यालयांना अधिकाअधिक अनुदान मिळविणे व त्यासाठीचे नियोजन करुन महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे डॉ.अनिल पाटील यांनी सांगितले.त्याचबरोबर उच्च शिक्षणातील सक्रीय सहभाग वाढविण्यावर भर देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयांना मिळणा-या अनुदानासाठी महाविद्यालयांना मार्गदर्शन करुन आयोगाकडून मिळणारे दीर्घ व लघू शोध शोध प्रकल्पांना चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.तसेच विद्यापीठाच्या प्रस्तावित बृहत आराखड्यामध्ये गरजेनुसार अभ्यासक्रम,महाविद्यालयांची संरचना व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणे,स्कील इंडिया मिशनला अनुसरुन औद्योगिक व व्यावसायिक अभ्यासक्रम,नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने बृहत आराखडा तयार करण्यावर प्रामुख्याने भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले त्याचबरोबर महाविद्यालयांचे लेखा परीक्षण आणि नॅक करुन घेण्यावरही भर देणार असल्याचे त्यांनी नमुद केले.

विद्यापीठाच्या पदव्युत्तर ,अध्यापन,संशोधन व विस्तार कार्यक्रम आणि विद्यापीठाचे सहभागात्मक कार्यक्रम यासंह विद्याविषयक विकास कार्यक्रमांसाठी मुख्य विद्याविषयक नियोजन व विद्याविषक लेखापरिक्षणाची महत्वाची जबाबदारी ही बीसीयुडी संचालकांची असते.त्याचबरोबर महाविद्यालयांच्या विद्याविषयक कार्यक्रमातील दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या विकास योजनासंदर्भात मंडळाने घेतलेल्या निर्णयांची कार्यवाही व अंमलबजावणी संबंधित प्राधिकरणाकडून करुन घेण्याची महत्वाची जबाबदारी त्यांना पार पाडावी लागते.तसेच विद्यापीठ,महाविद्यालये व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंस्था आणि वैज्ञानिक,औद्योगिक व वाणिज्यिक संघटना यांच्यामधील सहयोग वृध्दींगत करण्यासाठी व त्यास चालना देण्यासाठी महत्वपूर्ण जबाबदारी बीसीयुडी संचालकांची असते.

डॉ. अनिल पाटील यांनी १९८५ ला इंस्टीट्यूट ऑफ सायन्स येथून एमएस्सीचे शिक्षण पूर्ण केले आहे आणि १९९२ ला मुंबई विद्यापीठातून वनस्पतीशास्त्रातून पीएचडी पूर्ण केली आहे.२००० ते २००६ या कालावधीत डॉ.पाटील यांनी  मुंबई विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि संचालक विद्यार्थी कल्याण विभाग म्हणून काम पाहिले.त्यांच्या या कार्यकाळात त्यांनी मुंबई विद्यापीठातर्फे युवा संसद,विद्यार्थी कल्याण विभागातील अनेक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले आहे.राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना राज्य शासनाचा उत्कृष्ट कार्यक्रम समन्वयाचा २००२ चा राज्य पुरस्कार आणि १९९९ ला राष्ट्रीय स्तरावरचा इंदिरा गांधी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी पर्यावरण संशोधनावर अनेक शोध निबंध सादर केले असून पर्यावरण संशोधनाच्या अनेक प्रकल्पावर काम केले आहे.केंद्र सरकारच्या पर्यावरण वाहिनी या समितीचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले आहे तर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या जनसुनावणी समितीवर त्यांनी काम केले आहे.शैक्षणिक क्षेत्रासह  विविध सामाजिक कार्यात डॉ.पाटील यांचे अभुतपूर्व योगदान असून त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या विविध समित्यावर काम केले आहे.मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या १०२ व्या भारतीय विज्ञान परिषदेत त्यांनी कृषी या क्षेत्रातील सेक्शनल सेक्रेटरी म्हणूनही यशश्वीरित्या काम केले आहे.

( सोबत डॉ.अनिल पाटील यांचे छायाचित्र पाठवित आहे.)

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)